मुंबई हल्ल्याचे पडसाद

# पुणे विद्यापीठात सुरक्षा केंद्र

## कुलगुरूंची घोषणा : पदवी अभ्यासक्रमात आपत्ती व्यवस्थापन सक्तीचे

सकाळ वृत्तसेवा

पुणे, ता. ३० : येत्या शैक्षणिक वर्षापासून पदवी अभ्यासक्रमाला प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना आपत्ती व्यवस्थापन अभ्यासक्रम सक्तीचा करण्यात येणार आहे, तसेच वाढत्या दहशतवादाच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठात अंतर्गत सुरक्षा केंद्र स्थापन करण्यात येणार असून, या विषयावर काम करणारा 'थिंक टँक' सुरू करण्यात येणार आहे.

कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव यांनी पत्रकार परिषदेत विद्यापीठाच्या विविध निर्णयांची, तसेच हीरक महोत्सवी वर्षात घेण्यात येणाऱ्या योजनांची माहिती दिली. ते म्हणाले, "आपत्ती व्यवस्थापनाबाबत केवळ जागरूकता असून चालत नाही. तशी वेळ आली तर नेमके काय केले पाहिजे, याबाबत विद्यार्थ्यांना प्रशिक्षण मिळाल्यास सर्व समाजाला त्याचा फायदा होईल, हे लक्षात घेऊन येत्या शैक्षणिक वर्षापासून हा अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहे. सर्व शाखांच्या पदवीच्या विद्यार्थ्यांसाठी हा नवा अभ्यासक्रम सक्तीचा असून, पदवीच्या तीन वर्षांतील कोणत्याही एका वर्षात पूर्ण करता येईल. अभ्यासक्रमाचे स्वरूप आणि इतर आवश्यक तपशील लवकरच ठरविण्यात येईल. पुणे शहरात निवृत्त लष्करी अधिकारी व जवानांची संख्या खूप मोठी आहे. त्यांच्या मदतीने महाविद्यालयीन प्राध्यापकांना प्रशिक्षण देण्यात येईल. त्यानंतर हे प्राध्यापक महाविद्यालयात शिकवतील. या उपक्रमाचा एक भाग म्हणून येत्या १२ जानेवारीच्या युवक दिनाचे औचित्य साधून दोन दिवस आपत्ती व्यवस्थापन, तसेच शस्त्रास्त्रांची माहिती देणारे शिबिर विद्यापीठात आयोजित करण्यात येईल. लष्कर व अग्निशमन दलाच्या मदतीने हे शिबिर आयोजित करण्यात आले आहे. एके-५६ रायफलींसह विविध प्रकारची शस्त्रास्त्रे विद्यार्थ्यांना प्रदर्शनात पाहावयास मिळतील. राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे उपाध्यक्ष के. एन. सिंग व लष्कराच्या दक्षिण विभागाचे प्रमुख लेफ्टनंट जनरल नोबल थंबुराज हे या वेळी उपस्थित राहणार आहेत.

### कुलगुरू म्हणाले

- विद्यापीठात मराठी भाषा अभ्यास केंद्र सुरू करणार
- क्षमतेहून अधिक प्रवेश दिलेल्या सर्व महाविद्यालयांवर कारवाई
- 'ट्रिपल कनेक्टिव्हिटी'चा विद्यापीठ आवारातील प्रायोगिक टप्पा पूर्ण
- १० फेब्रुवारीला आणखी शंभर महाविद्यालयांत राबविणार
- जैवतंत्रज्ञान साधन केंद्र विद्यापीठात स्थापन करणार
- विद्यापीठ विभागांचे व महाविद्यालयांचे 'ॲकॅडमिक ऑडिट' करणार
- विद्यापीठाबरोबरच नाशिक व नगर येथे प्राध्यापकांसाठी प्रयोगशाळा
- स्वायत्ततेवर चर्चा करण्यासाठी फेब्रुवारीत विद्या परिषदेची बैठक
- हीरक महोत्सवी वर्षात डी. लिट. देणार
- 'एमए' व 'एमएस्सी'चे नवे अभ्यासक्रम

**विद्यापीठात प्रवेशासाठी ओळखपत्र हवे**

सुरक्षिततेची उपाययोजना म्हणून विद्यापीठात प्रवेश करणाऱ्या प्रत्येकाचे ओळखपत्र तपासण्यात येणार आहे. विद्यापीठात रोज फिरावयास येणाऱ्या नागरिकांकडून सध्या माहितीचे अर्ज भरून घेण्यात येत आहेत. येत्या काही दिवसांत या योजनेची अंमलबजावणी होईल.

पुढील पाच वर्षांत केंद्र सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागाकडून १५ कोटी रुपये मिळतील, तसेच उच्च क्षमताशील विद्यापीठ योजनेत विद्यापीठ अनुदान आयोगाकडे (यूजीसी) शंभर कोटी रुपयांची मागणी केली आहे, असे डॉ. जाधव यांनी सांगितले. ते म्हणाले, "राज्य सरकारकडे थकीत असलेले २६ कोटी रुपये मिळविण्याचे प्रयत्न सुरू आहेत. याशिवाय इरास्मस मुंडूस या आंतरराष्ट्रीय शिष्यवृत्ती योजनेतील सुमारे वीस कोटी रुपयांचा निधी पुणे विद्यापीठाच्या वाट्याला यावा यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येतील."

सकाळ 31/12/7

# पुणे विश्वविद्यालय द्वारा आगामी वर्ष से आपदा व्यवस्थापन पाठ्यक्रम अनिवार्य : डॉ. नरेंद्र जाधव

पुणे, 30 दिसंबर (आ.प्र.)

'आगामी शैक्षिक वर्ष (2009-2010) से महाविद्यालयीन छात्रों के लिए 'आपदा व्यवस्थापन पाठ्यक्रम' आरंभ किया जाएगा. यह पाठ्यक्रम एफ.वाई. से टी.वाई तक सभी छात्रों के लिए अनिवार्य रहेगा. इसके बिना विश्वविद्यालय द्वारा उपाधि प्रदान नहीं की जाएगी. पुणे विश्वविद्यालय में अंदरूनी सुरक्षा हेतु 'अंतर्गत सुरक्षा केंद्र' की भी स्थापना की जाएगी.' यह जानकारी कुलगुरु डॉ. नरेंद्र जाधव ने आज पत्रकार वार्ता में दी.

मुंबई में हुए आतंकवादियों के हमले से पुणे विश्वविद्यालय में कठोर सुरक्षा व्यवस्था रखी गई है. इसके लिए अलग से समिति गठित की गई है. पुणे विश्वविद्यालय में सुबह घूमने के लिए आने वालों को पहचानपत्र अनिवार्य किया गया है. वाहनों के लिए प्रवेश पर पाबंदी लगाई जाएगी. वाहन पार्किंग विद्यापीठ के बाहर करना आवश्यक है.



विश्वविद्यालय में सीसी कैमरे भी लगाए जाएंगे. आगामी शैक्षिक वर्ष (2009-2010) से छात्रों के लिए कुछ संकट, आपत्ति निर्मित होने पर आपदा प्रबंधन की जानकारी होनी चाहिए. इस उद्देश्य से आपदा प्रबंधन कोर्स हर कॉलेज में जारी किया जाएगा. इसके लिए कॉलेज के तीन प्राध्यापकों को विश्वविद्यालय में प्रशिक्षण दिया जाएगा. यह पाठ्यक्रम केवल प्रथम, द्वितीय एवं तृतीय वर्ष के छात्रों यानी स्नातक उपाधि पूर्व के लिए रखा है. यह प्रशिक्षण पुणे के निवासी फौजी अधिकारी एवं विश्वविद्यालय के डिफेंस विभाग द्वारा प्रदान किया जाएगा. सुरक्षा व्यवस्था के बारे में विश्वविद्यालय द्वारा जनजागृति, जन प्रबोधन किया जाएगा. आगामी 12-13 जनवरी को समर्थ भारत के लिए 'समर्थ युवा' के माध्यम से जनजागृति शिविर का आयोजन किया गया. सदर्न कमांड के प्रमुख लेफ्टिनेंट जनरल नोबल थंबुराज व राष्ट्रीय आपदा प्रबंधन प्राधिकरण के अध्यक्ष के.एन. सिंह इस शिविर में मार्गदर्शन करेंगे. पुणे विश्वविद्यालय का स्थापना दिवस 10 फरवरी को मनाया जाएगा. इस मौके पर मराठी भाषा के संवर्धन व विकास हेतु मराठी भाषा अध्ययन केंद्र की स्थापना की जाएगी. इस केंद्र का उपयोग गैर मराठी भाषियों को मराठी भाषा सिखाने के लिए किया जाएगा. विश्वविद्यालय के सभी विभागों का अकादमिक ऑडिट किया जाएगा. पुणे, नासिक, अहमदनगर पर अनुसंधान के लिए रिसर्च फैसिलिटी सेंटर की स्थापना की जाएगी. पुणे विश्वविद्यालय के अंतर्गत समाविष्ट 18 महाविद्यालयों ने अतिरिक्त प्रवेश दिए हैं. इसलिए उन पर दंडात्मक कार्रवाई भी की जाएगी. यह जानकारी भी अंत में कुलगुरु डॉ. नरेंद्र जाधव ने दी.

चिंतन इमेज मेकर

आज का आनंद 31/12/7